# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

दिनांक 19.09.2020 शनिवार

(गुन्हे)

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मु.दा.का अन्वये 04 केसेस 06 आरोपींना अटक करून 11,36,348 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 07 केसेस 16 आरोपींना अटक करून 18,392 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा—या 00 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 232 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 71,550 रू वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. वाठोडा — जिवानीशी ठार मारणा—या आरोपींना अटक :**

दिनांक 18.09.2020 चे 1750 वा पुर्वी सौ. वर्षा मधुकर ठाकरे, वय 44 वर्ष रा. न्यु नेहरू नगर, प्लॉट नं. 193, नागपूर यांचा मुलगा यश मधुकर ठाकरे वय 19 वर्ष यास आरोपी क्र. 1) अली इम्तियाज मुख्तार अली, वय 21 वर्ष, रा. मोठा ताजबाग, नागपूर, याने मोबाईलने फोन करून पोस्टे वाठोडा हद्यीत सेनापती नगर जवळील मोकळया मैदानाचे रोडचे कडेला बोलावून आरोपी क्र. 2) शेख आसीम शेख रशीद वय 24 वर्ष, रा. गोसीया कॉलनी, हुडकेश्वर, नागपूर सह संगणमत करून कोणत्यातरी कारणावरून कोणत्यातरी धारदार शस्त्राने यश याचे डोक्यावर, छातीवर व गळयावर वार करून जिवानीशी ठार मारले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे वाठोडा येथे पोहवा अनिल, 9503913078 यांनी आरोपीविरूध्द कलम 302,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे.

**3) पोस्टे धंतोली — फसवणुक :**

दिनांक 19.11.2019 चे 1200 वा चे सुमारास पोस्टे धंतोली हद्यीत राहणा—या 40 वर्षीय फिर्यादी यांच्या पतीची मॅक्स लाईफ इश्योरंन्स पॉलीसी असून मोबाईल क्र. 9682939609 च्या आरोपी धारकाने फिर्यादीस फोन करून तुमचे पॉलिसीचा हप्ता भरण्याची मुदत संपली असे खोटे बोलून तसेच दहा टक्के सुट देण्याचे आमिष देवून फिर्यादीस 91,292 रू ऑनलाईन भरण्यास लावून फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे धंतोली येथे पोउपनि लांडगे, 8108000385 यांनी आरोपीविरूध्द कलम 419,420,34 भादंवि सहकलम 66 (ड) आय.टी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. हुडकेश्वर — गैरकायद्याची मंडळी जमवून मारहान करणा—या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 18.09.2020 चे 1900 वा चे सुमारास पो.स्टे. हुडकेश्वर हद्यीत गोसीया कॉलनी, प्लॉट नं. 64, उमरेड रोड, नागपूर येथे राहणारे शेख जावेद शेख रहमान, वय 34 वर्ष, व त्यांची पत्नी यांच्यात घरगुती कारणावरून वाद झाला. त्यांच्यात आपसात समझोता करण्यासाठी फिर्यादीचे पत्नीची मावस बहीन नाजमा हीला बोलावीले होते. परंतु फिर्यादी व पत्नीची नाजमा हीचेसोबत बाचाबाची झाल्याने नाजमा हीने आपला पती आरोपी सिराज उर्फ बंटी शेख रा. रामकृष्ण नगर, दिघोरी, नागपूर यांना बोलावीले. नाजमा हीचे पतीने आपल्या ऑफीसमधील पाच ते सहा इसमांना फिर्यादीचे घरी आणून गैरकायद्याची मंडळी जमवून घरात घुसून फिर्यादीला शिवीगाळ केली. व हाथबुक्कीने मारहान करून

मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे सपोनि कदम, 9552582781 यांनी आरोपींविरूध्द कलम 142,143,147,149,323,504,506 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

<u>(अकस्मात मृत्यु)</u>

<u>पो.स्टे. हुडकेश्वर, गणेशपेठ, वाडी, एमआयडीसी :</u>

<u>1) हुडकेश्वर</u> :– दिनांक 17.09.2020 चे 0830 व चे सुमारास मनोज महादेव कापसे वय 40 वर्ष रा न्यु नेहरू नगर नागपूर हे पोस्टे हुडकेश्वर हद्यीत म्हाळगी नगर, दारूच्या भट्टीजवळ पडल्याने त्यांचे डोक्याला मार लागला त्यांना उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे हुडकेश्वर येथे पोउपनि भोले, 7030404783 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

<u>2) गणेशपेठ</u> – दिनांक 18.09.2020 चे 1158 वा चे पुर्वी पो.स्टे गणेशपेठ हद्यीत गणेशपेठ मॉडलमिल चाळ नं. 4, नागपूर येथे राहणारे महेश कृष्णराव बलनवार वय 50 वर्ष यांनी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यांना उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे गणेशपेठ येथे मपोउपनि मोकासे, 8380850350 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

<u>3) वाडी</u> – दिनांक 18.09.2020 चे 1630 वा चे सुमारास पो.स्टे वाडी हद्यीत महादेव नगर प्लॉट नं. 22, नागपूर येथे राहणारे फिर्यादी राहुल मिलिंद तिरपुडे, वय 37 वर्ष यांची 06 वर्षीय मुलगी कु. मानवी हिला कुलरचा करंट लागल्याने तिला उपचाराकरीता वेलट्रिट हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे वाडी येथे पोउपनि कावनपुरे, 9766201514 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

<u>4) एमआयडीसी</u> – दिनांक 12.09.2020 चे 2030 वा चे सुमारास कु. निकिता शेखर कनोजिया वय 18 वर्ष रा. प्लॉट नं. 10, शारदा नगर नागपूर हि तिचा मित्र हरी मडावी वय 21 वर्ष, रा. जयताळा नागपूर याची दुचाकी वाहन क्र. एम.एच/31/बी.एस/7125 ने मागे बसून जात असातांना पो. स्टे एमआयडीसी हद्यीत सुतगिरणी समोर, हिंगणा रोड, नागपूर येथे रस्त्यामध्ये गाय आडवी आल्याने हरीने गाडीचे अचानक ब्रेक लावले. त्यामुळे निकीता ही खाली पडली व तिचे डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाली. तिला उपचाराकरीता मेडिकल हॉस्पिटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 18.09. 2020 चे 1700 चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे एमआयडीसी येथे सपोउपनि नेमाडे, 9823151897 यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर